बांधकाम विकास विभाग, झोन क्र.७
स्वा.सावरकर भवन, चौथा मजला,
पुणे महानगरपालिका
जा.क्र.७/शाअजा/ज/१
दिनांक ६/४/2020

पुणे महानगरपालिका

## जाहीर प्रकटन

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जुन्या घरांना पावसाळ्यात धोका निर्माण होतो, अशा धोक्याच्या घरांपासून त्यामध्ये राहणाऱ्या नागरिकांना व त्या घराच्या आसपास राहणाऱ्या नागरीकांस तसेच ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या जिवितास धोका पोहोचणे संभव असतो. तो टाळण्याच्या दृष्टीने जुन्या घरांच्या तपासणी करून धोका नाहीसा करण्याबाबतीत शक्यतो सर्व दक्षता घेतली जाणे गरजेचे आहे.

धोक्याच्या इमारती व इमारतीतील धोक्याचा भाग उतरवून घेणे इ. करता पुणे महानगरपालिकेकडे एक स्वतंत्र उपविभाग कार्यरत आहे. तथापि आपापल्या मालकीच्या इमारती संबंधी वेळोवेळी तपासणी करून ती इमारत सुरक्षित राखण्याची जबाबदारी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २६५ अन्वये प्रत्येक घरमालकाचे आहे. ही जबाबदारी पार पाडण्याकरता आपापल्या इमारतींची तज्ञ स्ट्रक्चरल इंजिनियर यांजकडून तपासणी करून घेवून त्यांच्या सुचनेनुसार व महानगरपालिकेकडून आवश्यक ती परवानगी घेवून इमारत योग्य प्रकारे दुरूस्ती करून घेणे आवश्यक आहे, अशी व्यवस्था संबंधित धोक्याच्या घरांच्या मालकांनी करावी अशी सूचना या प्रकटनाद्वारे करण्यात येत आहे. या अनुषंगाने शहरातील एखादी इमारत अगर तिचा काही भाग, छप्परकाम, जीना, पटई काम, इ. भाग धोक्याचा अथवा पडावयास आला आहे असे दृष्टीक्षेपात आल्यास त्याबाबतची लेखी माहिती कोणीही नागरिकाने पुणे मनपा येथील मुख्य इमारतीतील मा.शहर अभियंता यांचे कार्यालयात सत्वर द्यावी अशी विनंती करण्यात येत आहे. सदर बाबत धोकेदायक घरांची पाहणी करून धोका नाहीसा करण्याच्या दृष्टीने शक्य ती उपाययोजना पुणे महानगरपालिकेकडून करण्यात येईल.

महानगरपालिकेच्या वतीने काही धोकादायक इमारतीची तज्ञ स्ट्रक्चरल इंजि.कडून तपासणी करून घेण्यात आली आहे. त्याचे अहवालमध्ये धोकादायक व राहण्यास अयोग्य असे नमूद केलेल्या जुन्या घरांमधील मालक/भाडेकरू/रहिवाशी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २६८ (बी) व (सी) अन्वये राहती जागा धोका टळेपर्यंत त्वरीत खाली करणेच्या नोटीसा बजाविणेत आल्या आहेत. अशा नोटीस बजाविणेत आलेल्या नागरिकांनी सदर घरे त्वरीत खाली करणे आवश्यक आहे. इमारत रिकामी करणेपुर्वी त्यामधील भाडेकरू/ सदनिकाधारक यांच्या ताब्यात असलेले चटई क्षेत्र मोजून त्याप्रमाणे प्रत्येक भाडेकरू/सदनिकाधारक व मालक/सहकारी संस्था यांना तसे प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यासाठी संबंधितांनी मा.कार्यकारी अभियंता, बांधकाम विकास विभाग, झोन क्र.७, स्वा.सावरकर भवन, चौथा मजला, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

जे नागरिक अशा धोक्याच्या नोटीसा दिलेल्या किंवा धोकादायक घरात राहत असतील तर ते नागरिक व्यक्तीशः स्वतःच्या जबाबदारीवर राहत आहे. या धोकादायक घरात राहत असताना जर काही अपघात झाल्यास पुणे म.न.पा. त्या अपघातास जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच अशा घराच्या मालकांनी तज्ञ

Scanned with CamScanner

स्ट्रक्चरल इंजि.च्या दुरूस्ती अहवालासह दुरूस्ती प्रस्ताव दाखल करून दुरूस्तीस पुणे म.न.पा.ची परवानगी घेऊन दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

शहरातील एखादी इमारत अथवा तिचा काही भाग आकस्मितरित्या कोसळल्यास त्याची माहिती पुणे महानगरपालिकेस दुरध्वनी क्र. ०२०-२५५०१००० तसेच कसबा पेठ फायर बिग्रेड दुरध्वनी क्र. ०२०-२४५७८९५० व सेंट्रल फायर बिग्रेड, भवानी पेठ दुरध्वनी क्र. ०२०-२६४५१७०७ तसेच १०१ वर तात्काळ मदतीसाठी संपर्क साधावा.

घराचा एखादा भाग धोक्याचा झाला असल्यास व सदर भागाची दुरूस्ती करणे शक्य असल्यास मिळकतीच्या मालकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २६४(१) अन्वये दुरूस्तीची नोटीस देण्यात येते व घरमालकाने दुरूस्ती करणेबाबत असमर्थतता दर्शविल्यास जागेवरील ऑक्युपायर/भाडेकरी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ४४६ नुसार दुरूस्ती करून घेणेसाठी आवश्यक नकाशे योग्य त्या कागदपत्रांसह ला. आर्किटेक्ट अथवा ला.इंजिनिअर यांचेमार्फत प्रस्ताव दाखल केल्यास दुरूस्ती परवानगी देण्यात येते, याची नागरिकांनी नोंद घ्यावी. तथापि अशा दुरूस्तीचे काम होईपर्यंत धोक्याच्या घरात नागरिकांनी राहू नये किंबहूना पावसाळ्याच्या काळात नागरिकांनी धोक्याच्या घरात न राहता राहण्याची पर्यायी व्यवस्था अन्यत्र करणे योग्य होईल. धोक्याच्या घराबाबत दुरूस्तीसाठी मालक अथवा ऑक्युपायर/भाडेकरी यांच्याकडून येणाऱ्या अर्जाचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. याबाबत काही अडचण आल्यास त्याचे निराकरण करून घेण्यासाठी मा.कार्यकारी अभियंता, बांधकाम विकास विभाग, झोन क्र.७, स्वा.सावरकर भवन, चौथा मजला, पुणे महानगरपालिका यांचे बरोबर मार्गदर्शनासाठी कार्यालयीन वेळेमध्ये समक्ष संपर्क साधने उचित होईल.

पावसाळा सुरू होत असल्याने नागरीकाच्या जिवितास होणारा धोका व संभाव्य जिवित, वित्तहानी टाळण्याच्या दृष्टीने सदरकामी पुणेकर नागरीकांनी पुणे महानगरपालिकेस वर नमूद केल्याप्रमाणे जरूर ते सहकार्य करावे, अशी विनंती आहे.

शहर अभियंता
पुणे महानगरपालिका

Scanned with CamScanner